# कोल्हापूर महानगरपालिका
## राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
## एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

### राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी पद भरती जाहीरात सन २०२४-२५

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविणेत येणा-या विविध कार्यक्रमासाठी कोल्हापूर महानगरपालिका एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीकरीता खालील तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे एकत्रीत मानधनावर कंत्राटी रिक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, या पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. खालील नमूद केलेली पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून राष्ट्रीय आरोग्य अभियान धोरणानुसार पदाची नियुक्ती ही २९ जून २०२५ अखेर राहील.

| अ क्र | पदाचे नांव | कमाल वयोमर्यादा | शासन मान्यताप्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन | एकूण भरावयाची पदे | जातीचा प्रवर्ग पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत) | खुला करीता १८ ते ३८ वर्ष व इतर संवर्गासाठी १८ ते ४३ इतकी वर्ष राहिल | MBBS | ६०,०००/- | २ | विजा-अ -१<br>एसईबीसी - १ |
| २ | स्टाफ नर्स | | GNM / B.Sc nursing & Maharashtra nursing Council Registration / Renewation Certificate Compulsary. | २०,०००/- | १२ | अज-१<br>भज-क-१<br>भज-ड-१<br>इमाव-३<br>एसईबीसी – ३<br>ईडब्ल्यूएस-२<br>खुला-१ |

महत्वाच्या सुचना :-

१. सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण संबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.
२. पदासमोर नमूद केलेले मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.
३. निवड झालेल्या उमेदवारांना दि.२९/६/२०२५ पर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडून अभियान सुरु ठेवणेस व पदांना मंजूरी मिळालेनंतर तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्यासच पुढील कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. पुनर्नियुक्तीबाबत शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.
४. पदांची संख्या, शैक्षणिक आर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजीक आरक्षण तसेच अटी व शर्तीमध्ये गरजेप्रमाणे बदल करणेची शक्यता आहे. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा प्रशासकसो कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.
५. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून नोटरी करुन द्यावा लागेल. करार पत्राचे अधिन नियुक्ती असेल.
६. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दिनांक ११/१०/२०२४ रोजी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे (राखीव प्रवर्गाकरीता कमाल वय ४३ वर्षे) राहील.



Kolhapur Municipal Corporation Reg. No.

७. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेस रिक्त पदी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देणेत येईल परंतू राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झालेस खुल्या प्रवर्गातील झालेल्या उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.

८. पात्र उमेदवार यांचेवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

९. अर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

१०. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांनी सर्व अनुषंगिक कागदपत्रे अर्जासोबतच सादर करावयाची आहेत. छाननी अंती पात्र उमेदवारांचा गुणांकन तक्ता प्रसिध्द करुन त्यावर हरकती मागविणेत येणार आहेत. हरकती दरम्यान गुणांकन तक्त्यामध्ये नमूद माहितीबाबत हरकत नोंदवता येईल. तसेच हरकती दरम्यान कोणताही नवीन दाखला अथवा प्रमाणपत्र सादर करता येणार नाहीत किंवा सादर केलेस त्याचा विचार होणार नाही. कागदपत्राअभावी उमेदवारास अपात्र ठरवलेस इकडील कार्यालय जबाबदार असणार नाही.

११. निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती महापालिकेच्या https://web.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवाराशी केला जाणार नाही.

१२. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी या पदासाठी दर सोमवारी थेट मुलाखतीव्दारे पदभरती करणेत येईल याकरीता इच्छुक उमेदवारांनी सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत कोल्हापूर महानगरपालिका मुख्य इमारत येथे विहित नमुन्यात अनुषंगिक कागदपत्रांसहित अर्ज सादर करावेत. अर्ज पडताळणी अंती पात्र उमेदवारांची त्याच दिवशी दुपारच्या सत्रात मुलाखती घेणेत येतील.

१३. स्टाफ नर्स, या पदाकरीता अर्ज करणा-या ईच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज विहीत नमून्यात कार्यालयीन कामकाजाचे वेळी दिनांक ०५/०५/२०२५ ते १४/०५/२०२५ अखेर मा.आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ----- पदाकरीता अर्ज असा लिफाफ्यावर उल्लेख करुन मुख्य इमारत महानगरपालिका येथे वेळेत पोहोच होईल याप्रमाणे सादर करावयाचा आहे. कोणत्याही टप्प्यावर अर्ज सादर करणेस झालेल्या विलंबास कोल्हापूर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१४. प्राप्त झालेले उमेदवारांचे अर्ज छाननी अंती पदानुसार वैद्यकीय अधिकारी, पदवी/पदविका/जीएनएम कोर्स इ. पदाच्या आवश्यक Qualifying exam मधील अंतिम वर्षाच्या गुणाच्या टक्केवारीच्या आधारे, पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असलेस तसेच संबंधीत पदाचे निगडीत अनुभव यामधील मिळालेल्या गुणांचे टक्केवारीप्रमाणे उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी तयार करुन उमेदवारांची नियुक्ती करणेत येणार आहे. तसेच स्टाफ नर्स या पदाकरीता जीएनएम पेक्षा अधिकतम शैक्षणिक अर्हता धारण केलेले उमेदवारांना प्राधान्य देवुन त्यांच्या अधिकतम शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या प्राप्त टक्केवारीनुसार मा.शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार गुणांकन तक्त्यानुसार उमेदवारांची निवड करणेत येईल.

१५. जाहीरातीत प्रसिध्द करणेत आलेल्या पदांकरीता शासकिय/निमशासकीय आरोग्य संस्थेकडील अनुभव ग्राहय धरणेत येईल. तसेच शासकिय/निमशासकीय आरोग्य संस्थेमध्ये विना मोबदला काम केले असेल तर सदर पदाचा अनुभव ग्राहय धरणेत येणार नाही.

१६. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदाकरीता अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१७. ज्या पदासाठी उमेदवारांना अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली शैक्षणिक अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१८. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती प्रक्रियेद्वारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झालेस रिक्त पदाच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविणेचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन प्रतीक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र



Kolhapur Municipal Corporation Reg. No.

उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देणेत येईल. संबंधीत राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झालेनंतर त्या उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.

१९. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहीरात दिनांकास साक्षेप समजण्यात येईल.

२०. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकिची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती पुर्वसुचना न देता रद्द करणेत येईल. तसेच आवश्यक असल्यास प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२१. उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्यांचे अद्ययावत असलेले ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अचुक नोंदवावे. तसेच ते भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील, याची दक्षता घ्यावी.

२२. महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमूना-अ या प्रपत्रात अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२३. उमेदवाराने अधिवास/राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिका-याकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२४. अपूर्ण माहितीचे अथवा विहित केलेली अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न देता रद्दबातल ठरविणेत येतील यासाठी उमेदवारास लेखी कळविणेत येणार नाही.

२५. अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

अर्ज करण्याची पध्दत :-

१) उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातच संगणकिकृत अर्ज करावा.

२) स्टाफ नर्स या पदाकरीता विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतींसह मा.आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांचे नांवे ब्युरो कार्यालय,मुख्य इमारत भाऊसिंगजी रोड, सी वॉर्ड कोल्हापूर या पत्यावर दिनांक १४/०५/२०२५ई.रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोच होतील अशा पध्दतीने पाठवावेत. वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता सोमवारी विहित नमुन्यातील अर्ज अनुषंगिक कागदपत्रांसहित सादर करून मुलाखतीस उपस्थित रहावे.

३) अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित केलेल्यां छायांकित प्रती जोडाव्यात. त्यामध्ये शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, पदानुसार संबंधीत कौन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र, जन्म नोंदीचा पुरावा असलेले प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र. तसेच इतर अनुषंगिक कागदपत्र, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, राखीव उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र, साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

४) एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास प्रत्येक पदासाठी वेगवेगळे व परिपुर्ण अर्ज करावेत.

५) पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

02.05.25

आरोग्याधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका

Kolhapur Municipal Corporation
Reg. No.

# - अर्जाचा नमुना -

| अर्जाचा नोंदणी क्रमांक : |
|---|

| ओळखपत्र आकाराचे छायाचित्र |
|---|

प्रति,
मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

विषय :- -------------------------- पदासाठी अर्ज.

| | |
|---|---|
| संपूर्ण नांव | : |
| वडिलांचे संपूर्ण नांव | |
| पत्ता | : |
| लिंग | : |
| जन्म दिनांक | : / / |
| विवाहीत/अविवाहीत | : |
| जाहिरात दिनांकास वय | : वर्षे - महिने - दिवस — |
| ई-मेल आयडी | : मोबाईल नंबर:- |
| जातीचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| | जातीचा प्रवर्ग |
| | जातीचे नांव |
| अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग | |

| अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल) | विद्यापीठाचे / परिक्षा मंडळाचे | उत्तीर्ण होण्याचे | घेतलेले विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अ) | | | | |
| ब) | | | | |
| क) | | | | |
| ड) | | | | |

सदर पदाचा पुर्वानुभव आहे काय ? (असल्यास खालील रखान्यात तपशील द्यावा) होय/नाही

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव व पुर्ण पत्ता | धारण केलेले पद | कार्यालय/संस्था शासकीय आहे काय | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी पासून - पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रावरती पृष्ठ क्र.सादर करावा.)

| अ.क्र. | | अ.क्र. | |
|---|---|---|---|
| १ | | २ | |
| ३ | | ४ | |
| ५ | | ६ | |
| ७ | | ८ | |
| ९ | | १० | |
| ११ | | १२ | |

## - उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र -

मी असे प्रमाणित करतो/करते की, या अर्जात दिलेली माहिती खरी आहे, त्यापृष्ट्यर्थ मी मुलाखतीचेवेळी प्रमाणपत्राच्या मुळप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस/नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिका-याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील आणि त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :- .................................

अर्जदाराची स्वाक्षरी :-

दिनांक :- .................................

..............................................................

नांव:- ..........................................................

---

## लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------------------------------------------------------------

श्री. -----------------------------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ---------- -------- वर्ष राहणार ---------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ---------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२.आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक १) / / २) / / )

३.दिनांक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३, जुलै २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकीय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- ----------------

अर्जदाराची स्वाक्षरी: ----------------------------------

दिनांक / /२०२४

अर्जदाराचे नाव: ----------------------------------